# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२३/०७/२०१८

## दि.२२/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १९५/१८,भादविक ३०७,३२६,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)(३)१३५, आर्म ॲक्ट ३(२५) |
| **फिर्यादी** | राजु पठारे,वय-२४,रा.कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | १.समीर उर्फ बंटी अंकुश पासलकर,वय-२०,रा.सनं.४४,राजीव गांधी पार्क,केळेवाडी,पुणे २. करण कैलास मोहोळ,वय-१९,रा.सुतारदरा,पुणे ३.अजय कैलास मापारे,वय-१९,रा.सदर ४. निलेश संतोष बोडके,वय-१९,रा.केळेवाडी,कोथरूड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/२०१८ रोजी २२/३० वा. राजे शिवराय मित्र मंडळा समोर मराठा मावळ कॉलनी, सुतारदरा,कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मित्र रूपेश साठे यांनी अजय मापारे याची चेष्टा केल्याची राग मनात धरून इतर इसमांनी संगनमत करून,फिर्यादी यांचा मित्र रूपेश साठे यास शिवीगाळ व हाताने मारहाण करून त्याचे डोक्यात बिअरची मोकळी बाटली मारून त्यास गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी यांना शिवीगाळ करून,समीर पासलकर याने त्याचेकडील पिस्टल काढुन फिर्यादी यांचे डोक्याला लावुन त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर रूपेश साठे यांचे आई-वडील,भाऊ व भावजय येत असल्याचे पाहुन त्यांचे दिशेनेही पिस्टल रोखुन जीवे मारण्याची धमकी देवुन त्यांनाही शिवीगाळ केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. यु.एच.माळी ८९९९२०६२६३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १६४/१८,भादविक ३०७,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | सैफ सैय्यद,वय-२१,रा.कोंढवा-बुद्रुक,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०७/२०१८ रोजी १४/३० वा. १२७८,कसबा पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांचा कामगार इरफान शेख याचेशी झालेल्या भांडणात फिर्यादी व त्यांचा भाऊ तौसिफ असे दोघांनी मिळुन इरफान यास मारहाण केली होती,त्याचा राग मनात धरून फिर्यादी हे त्यांचे जुने घराजवळ पाणी पिण्यास गेले असताना,नमुद इसमांनी आपसात संगनमत करून त्यांचेकडील लोखंडी पाईप,पालघन या हत्याराने फिर्यादी यांचा जीव जावा या उद्देशाने त्यांचे डोक्यात शरिरावर ठिक-ठिकाणी मारहाण करून,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.डी.पाटील ९७०२९७९०९० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १६५/१८,भादविक १४३,१४४,१४,१४८,१८९,३३६,४२७,महा.पो.का.क. ३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमी.लॉ.ॲमे.क. ७ |
| **फिर्यादी** | मिर लियाकतअली मंजर अली,वय-६०,रा.कसबा पेठ,पुणे |
| **आरोपी** | एकुंण सहा ते सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०७/२०१८ रोजी १८/३० वा. श्री ॲटो वर्क्स या गॅरेज समोर कुंभारवेस चौक,कसबा पेठ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नातेवाईक बबलु याने सैफ सैय्यद यास मारहाण करून जखमी केले होते,त्याचा राग मनात धरून,यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे श्री ॲटो वर्क्स या गॅरेज समोर हातात तलवारी व लोखंडी रॉड घेवुन येवुन,सदर भागात दहशत निर्माण करून, |

फिर्यादी यांचे गॅरेज समोर पार्क केलेली कार व दोन रिक्षा या वाहनांचे काचावर व तलवारी व लोखंडी रॉडने मारून,वाहनांच्या काचा फोडुन,तसेच फिर्यादी यांचे गॅरेजवर दगडी फेकुन मारून,लोखंडी कपाटाची काच फोडुन वाहनांचे व गॅरेजचे असे मिळुन एकुण १९ हजार रू किचे नुकसान करून फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. प्रविण भोपळे ९८९०८३७१२६

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** दत्तवाडी पो स्टे २८३/१८,भादविक ४५७,३८०,४२७

**फिर्यादी** राजेश हुकरे,वय-४७,रा.कोंढवा-खुर्द,पुणे

**आरोपी** अज्ञात

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२३/०७/२०१८ रोजी ००/०० वा.पासुन ते सकाळी ०६/०० वा.चे दरम्यान शिवाजी मराठा सोसायटीचे इंन्स्टियुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर (एमबीए कॉलेज),अरण्येश्वर, सहकारनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील शिवाजी मराठा सोसायटीचे इंन्स्टियुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च सेंटर (एमबीए कॉलेज) हे कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने कॉलेजचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,ऑफीस मधील पाण्याचे नळ तोडुन त्याचे नुकसान करून,एक सीसीटिव्हि डिव्हिआर बॉक्स,एक संगणक सीपीयु,पॅन ड्राईव्ह,कॅमेरा व असा एकुण २५,५००/- रूपये किचा ऐवज रात्रौ घरफोडी चोरी करून नेला.

**त.अंमलदार** पो.हवा. आर.जे.निगडे ९९२३१९५४७३

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वारजे पो स्टे २३५/१८,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२४,३२३,५०४,आर्म ॲक्ट क.३७(१)

**फिर्यादी** स्वप्निल मारणे,वय-३१ वर्षे,रा.कामना वसाहत,कर्वेनगर,पुणे

**आरोपी** एकुण सहा इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२२/०७/२०१८ रोजी १७/३० वा. अक्षदा स्नॅक सेंटर,मावळे आळी कर्वेनगर,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे अक्षदा स्नॅक सेंटर,मावळे आळी कर्वेनगर पुणे येथे वडापाव खात असताना यातील नमुद इसमांनी जुन्या भांडणातील पुर्व वैमानशातून फिर्यादीस तुला मस्ती आली आहे काय असे म्हणुन शिवीगाळ करून लाथा-बुक्यांनी मारहाण केली. तसेच त्यांचे हातातील कोयताने फिर्यादी यांचे डोळयावर व कपळावर वार करुन जखमी केले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. ए.व्ही.कदम ९४०३४४१५९७

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोरेगांव पार्क पो स्टे ७३/१८,भादविक ४९८(अ),३०६,३४

**फिर्यादी** लक्ष्मण कांबळे,वय-४५ वर्ष,रा.कोरेगाव पार्क,पुणे

**आरोपी** पृथ्वीराज ऊर्फ बाळा सुरेश वाघमारे,वय-२४ वर्ष,रा.राजीव गांधीनगर,संत गाडगे महाराज वसाहत,कोरेगाव पार्क,पुणे

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०९/०५/२०१६ ते दि.२२/०७/२०१८ रोजीपर्यंत राजीव गांधी नगर,संत गाडगे महाराज वसाहत,कोरेगाव पार्क,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांची मुलगी निकीता पृथ्वीराज वाघमारे,वय-२२ वर्षे,रा.सदर हीचे लग्न तीचा पती यातील नमुद इसम पृथ्वीराज ऊर्फ बाळा याचेसोबत दि.०९/०५/२०१६ रोजी होवुन, सासरी नांदत असताना,त्याने वेळोवेळी दारु पिवुन येवुन,तीचे चारित्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ व मारहाण करून,तीस माहेराहुन घर खर्चासाठी पैशाची मागणी करून,तीचा शारिरीक व मानसिक शारिरीक छळ करुन,सौ.निकीता हिस दि.२२/०७/२०१८ रोजी २१/०० वा.पुर्वी तीचे राहते घरातील लाकडी वाश्यास ओढणीच्या सहाय्याने गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एन.एम.पवार ९८२२७९१६९९

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४४/१८,भादविक ३५३,३३२,१८८,४२७,३४ |
| **फिर्यादी** | सचिन रणदिवे,पोलीस नाईक, येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०७/२०१८ रोजी १७/३० वा. ॲडलब चौक,कल्याणीनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी मा.व्हि.व्हि.आय.पी. महाराष्ट्र राज्य यांचे आगाखान ब्रिज ते लोहगांव विमानतळकडे जाण्याचा मार्गावर बंदोबस्तासाठी हजर राहुन त्यांचे शासकिय कर्तव्य बजावित असताना,ॲडलॅब चौकात व्हिव्हिआयपी यांचे जाण्याचे मार्गावर चौकात रोडलगत असलेल्या भाजी विक्रेत्यास दुकान तुर्त बंद ठेवणेबाबत व कॅनव्हाय गेल्यानंतर पुन्हा चालु करणेबाबत सुचना दिल्या असता,सदर भाजी विक्रेत्यांनी फिर्यादीस तुमच्या मुळे आमचा धंदा बुडुन आमचे ग्राहक निघुन गेले असे म्हणुन फिर्यादी यांना धक्का-बुक्की करून सरकारी गणवेश ओढुन त्याचे २००/- रुचे नुकसान करून फिर्यादीस मारहाण दुखापत केली. तसेच बंदोबस्त कर्तव्यास असलेले पो.शि.शेलार हे सोडविण्यास आले असता त्यांना ढकलुन देवुन यांना मारा असे म्हणुन फिर्यादी हे त्यांचे शासकिय कर्तव्य बजावित असताना,त्यांचे शासकिय कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहायक पोलीस निरीक्षक, जी.जी.मोरे ९५२७०००३२२८ |

## दि.२४/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५९६/१८,भादविक ३०२,३९४,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ३(२५) |
| **फिर्यादी** | राजकुमार धोत्रे,वय-५०,रा.राहटणी,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०७/२०१८ रोजी २३/३० वा. प्रभात रोड कॉलनीचे कॉर्नर जवळ,न्यु राज मेन्स वेअर दुकानाचे समोर रहाटणी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ अनिलकुमार रघुनाथराव धोत्रे,वय-४४,रा.हरीओम निवास प्रभात रोड,कॉलनी,राहटणी,पुणे हा त्याचे ज्योती टुर्स व ट्रॅव्हल्स,पाचपीर चौक,काळेवाडी चौक येथील दुकान बंद करून सोबत काळे रंगाचे बॅग मध्ये दुकानात जमा झालेली १ लाख ९६ हजार रूपये रोख रक्कम घेवुन,त्यांचे बुलेट मोटार सायकलवरून राहते घरी जात असताना, नमुद ठिकाणी मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसमांनी अनिलकुमार यांचे जवळील रोख रक्कम जबरदस्तीने चोरून नेण्याचे उद्देशाने त्यांचेकडील बंदुकीतुन अनिलकुमार यांचेवर गोळी झाडुन त्यांना जीवे ठार मारून,त्यांचेजवळील रोख रक्कम जबरी चोरी करून घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) सुनिल पिंजण ८१०८१२८४२२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**